सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☏२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☏२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक : एनओटी-३६१७/सीआर-२४/२०२०/तीन दिनांक ९ ऑगस्ट, २०२१

# घोषणा

**विषय** : दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग मुख्य परीक्षा २०२० - अर्ज सादर करण्याबाबत

जाहिरात क्रमांक ०१/२०२०, दिनांक ३ जानेवारी, २०२० नुसार आयोगामार्फत रविवार, दिनांक १ मार्च, २०२० रोजी घेण्यात आलेल्या दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग पूर्व परीक्षा - २०२० चा निकाल आयोगाच्या संकेतस्थळावर दिनांक ११ ऑगस्ट, २०२० रोजी प्रसिद्ध करण्यात आला आहे. सदर निकालाआधारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या प्रत्येक उमेदवाराला आयोगाकडील नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर एसएमएस द्वारे वैयक्तिकरित्या कळविण्यात येत आहे.

२. प्रस्तुत मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र उमेदवाराने आयोगाच्या संकेतस्थळावर दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग मुख्य परीक्षा - २०२० करीता दिनांक ६ ऑगस्ट, २०२१ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेल्या अधिसूचनेचे काळजीपूर्वक अवलोकन करून आयोगाच्या https://mpsconline.gov.in या संकेतस्थळाद्वारे **दिनांक २० ऑगस्ट, २०२१** पर्यंत अर्ज सादर करणे तसेच विहित कालावधीत परीक्षा शुल्काचा भरणा करणे आवश्यक आहे. त्याशिवाय मुख्य परीक्षेच्या प्रवेशाकरीता पात्र समजण्यात येणार नाही.

३. आयोगास अर्ज सादर करण्याची तसेच परीक्षा शुल्काचा भरणा करण्याची कार्यवाही विहित कालावधीत पूर्ण न केल्यास यासंदर्भातील तक्रारींची नंतर दखल घेतली जाणार नाही.

४. परीक्षेच्या प्रवेशासंदर्भात विहित दिनांकानंतर संपर्क साधल्यास त्याचा कोणत्याही प्रकारे विचार केला जाणार नाही.

सह सचिव, परीक्षा पूर्व
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

ठिकाण : मुंबई